# समकालीन मानवी हक्क




सपांदक
**डॉ. रिता एम. धांडेकर**

Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# समकालीन मानवी हक्क

■ डॉ. रिता एम. धांडेकर

■ प्रथम आवृत्ती – १० डिसेंबर २०२१

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना
विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी
सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 200/-

ISBN-978-93-91305-56-7

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख / लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|
| 1 | महिला सुरक्षा एवं महिला अधिकार<br>**डॉ.(श्रीमती) शक्ति जैन** | 1 |
| 2 | भारत में मानवाधिकार की स्थिती<br>**डॉ. किशोर बी. वासनिक** | 15 |
| 3 | भारतीय लोकतंत्र में मौलिक अधिकारों का महत्व<br>**डॉ. कृष्णा सोलंकी** | 23 |
| 4 | महात्मा गांधी व मानवाधिकार **डॉ. डी.एन.प्रसाद** | 27 |
| 5 | महीलाओं के कानुनी अधिकार<br>**प्रा.कविता आर. किर्दक** | 33 |
| 6 | महिलांची सुरक्षा व मानवाधिकार **डॉ.मीनाक्षी कुबडे** | 38 |
| 7 | भारतीय संविधान आणि मानवी अधिकार : एक चिकित्सक अध्ययन **डॉ.सुभाष दौलतराव उपाते** | 45 |
| 8 | भारतीय स्त्रीवर्गाचे हक्क व मानवाधिकार<br>**प्रा.डॉ. एन. आर. वर्मा** | 56 |
| 9 | मानवी हक्क आणि सामाजिक न्याय :एक समाजशास्त्रीय मुल्यमापन **प्रा.डॉ.नाजूकराम बनकर** | 63 |
| 10 | स्त्रीवाद आणि सामाजिक समानता<br>**प्रा.डॉ.सौ. मंगल एकनाथ डोंगरे** | 68 |
| 11 | आदिवासी समाज आणि मनाव अधिकार<br>**डॉ. रमेश बलभीम जाधवर** | 75 |
| 12 | मानवी हक्क : न्यायालयीन प्रक्रिया एक चिंतन<br>**प्रा.डॉ. राठोड एस.जी.** | 83 |
| 13 | भारतीय राज्यघटना व मानवाधिकार<br>**प्रा.डॉ. संजय एम. अवधुत** | 87 |



Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# भारतीय संविधान आणि मानवी अधिकार : एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. सुभाष दौलतराव उपाते**
सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग प्रमुख आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली
Email ID : subhashupate05@gmail.com

---

**सारांश :**

१० डिसेंबर १९४८ रोजी जागतीक संघटनेने मानवी हक्काची सनद पारीत केली.[१] व यामधुन जगभरातील माणसांमध्ये प्रतिष्ठा प्राप्त जीवन जगण्याचे आश्वासक वातावरणाला बळ दिले. त्यामुळे हा दिवस जागतीक संदर्भात ऐतिहासिक आहे. सनदेतील कलम १ ते ३० ज्ञानार्जन केल्यास मानवी हकांच्या परिघाने अचंबित अर्थात मानवी हक्काच्या कक्षांचा विस्तार विस्तृत आणि सखोल असा आहे. सनदेच्या निर्मितीत व पुढाकारात अमेरिकन युरोपियन वर्ग आघाडीवर आहे. असे असताना हकाच्या संदर्भातील विचार विशिष्ट खंडापर्यंत मर्यादीत हेतुने बांधल्या गेलेला नसून नवस्वतंत्र अशा आशिया—आफ्रिका खंडाकरीता तो तितकाच महत्वाचा आहे. वंश, जाती, वर्ग यामध्ये विखुरल्या गेलेल्या समुहात प्राधान्याने बळी जातो तो मानवतेचा, मानवी हक्कांचा. भारताच्या संदर्भात विचार करताना सातत्याने प्रत्ययास येणारी बाब म्हणजे, येथे मानव व त्याच्याशी निगडीत जीवनदायी मूल्ये या दृष्टिने फारसे गांभीर्याने आणि सहीष्णुतेच्या अंगाने लक्षात घेतल्या गेलेच नाहीत. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती निर्मुलनाच्या तिच्या अंताबाबत अतिशय आग्रही भूमिका मांडलेली होती.[२]



Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

**प्रस्तावना:**

संविधान निर्मितीच्या प्रक्रियेपासूनच यावरील चर्चा, वाद सुरूच आहेत. रचनाकारांना संविधान उद्दिष्टात प्रतिष्ठा प्राप्तीच्या दलितांच्या कक्षेत शेतकरी, मजुर, कामगार, बालके, महिला, अनाथ, वंचित, शोषित, पिडित, सर्वस्व गमावलेले, विस्थापित, पूरग्रस्त दुष्काळग्रसत, वितंडीत झालेले, प्रतारणा झेलणारे, देहविक्रय करणारे, जाणिवपूर्वक गुन्हेगारी वर्तुळात ढकलल्या गेलेले, अगतिक अशा विभिन्न गट समुहांचा विचार करणे, त्याबाबतीत निर्माण झालेल्या बहुसंख्य गटांचा विचार करणे, मानवीय हक्कांच्या लढ्यप्रती त्यांची उदासीनता, वर्गनिहाय भारतात जन्माला आलेले बदलत्या मानसीकतेचा विचार करणे, त्यावरील राजकीय नियंत्रण यांचे सूक्ष्म अवलोकन केल्यास यशाच्या प्राथमिक टप्प्यावर पोहचत आहोत की काय? असे विदारक दु:ख निरिक्षणातूनच नोंदविल्या जात आहे सर्व प्रश्नांची तिव्रता, परिणामकारकता लक्षात घेऊन धोरणात्मक आखणी करावयाची असा पेच आजतागायत सुरलेला नाही. भारतीय संविधानातील भाग ... व भाग ४ आणि अनुच्छेद १२ ते ५१[३] यामधून मानवी व्यक्तीच्या प्रतिष्ठेला संरक्षित व अंमल स्वरूपात आणुन मानवी हक्क संकल्पनेचा विस्तार घडवून आणलेला आहे. भारतीय संविधानातील मूलभूत तत्वे इतर संविधानिक रचनांच्या तुलनेत मानवी हक्कांना जवळची आहे. भारतीय रचनाकारांना येथील विषम व्यवस्थेची जाणीव असण्यासोबतच शिल्पकाराला तर त्याची चटके बसलेली होती. विषमतापूर्ण भारतीय समाजरचनेला प्रभावी उपचार ठरू शकणाऱ्या अनुच्छेदांना अंतर्भूत करून नागरी हक्काला संरक्षीत करण्यात आले. हे वास्तव नाकारता येत नाही.

**मुळ शब्द** : मानवाधिकार, संविधान, मार्गदर्शक तत्वे, मुलभुत अधिकार व कर्तव्ये.

उद्दिष्टे :१. मानवाधिकारांच्या सनदेच्या बाबत अध्ययन करणे



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

२. भारतातील विविधांगी प्रश्नांचे अध्ययन करणे.
३. भारतीय संविधानिक तरतुदिंचे अध्ययन करणे.

**परिभाषा:**

■ इलेनोर रूझवेल्ट : कुटुंबातून मानवी हक्कांचा उगम होतो, ज्या कुटुंबातून मानवी जोपासले गेले तर त्या समाजात किंवा देशात मानवी हक्कांचे पालन होईल. पुढे म्हणतात, "The Destiny of Human rights she said vis in the hands of all our Citens in all of our communities[४] एका व्यक्तीचे व्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राहये हे दुसऱ्या व्यक्तीचे कर्तव्य असते.

■ नानी पालखीवाला यांनी मानवी हक्कांविषयी जागतिक वकील संघ, न्यूयॉर्क येथे ११ सप्टेंबर १९८६ मध्ये म्हटले होते की, "It is difficult to measure whether reperession world wide is increasing or decreasing or decreaingm but awareness of that repression has undoubtedy increased, since the human rights movement started as a world movement. There are two gleams of hope. The concept of human rights the new gospl has worked its way through the subsoil of human consciousness with speed and strength, and has become one of the great driving force of our time. More and more people the world over realize and realize more clearly that there should be increased human rights inspections and publicizing of abuses"[५] प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य व संपूर्ण विचार घडविण्याचा या जाहिरनाम्यात उल्लेख आहे.

संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात पांडुरंगाला विश्व शांती आणि मानवी अधिकाराचे जोरदार समर्थन केलेले दिसते ते येणेप्रमाणे :

'आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे।
तोषोनि मज द्यावे पसायदान हे
जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मी रति वाढो।
भूतां परस्परे पड़ो। मैत्र जीवांचे
दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

जो जे वांच्छील तो ते लाहो। प्राणिजात□'

विषय विस्तार:

जागतिक पातळीवतील सर्वात मोठ्य भारतीय लोकशाहीने अनेक शासनकर्त्यांच्या शासन व्यवस्थेला त्यांची जागा दाखवून देण्याचे काम केले. ''वसुधैवकुम्बकम'' आणि ''सर्वे भवन्तु सुखिन:, सर्वे सन्तु निरामया'' या वेदातील रचनेचा परिपाक ''सर्वधर्म समानस्य'' सहिष्णुता, सहअस्तित्व, पंचशील आणि समन्वय यासारख्या सैद्धांतीक आणि व्यावहारिक तत्वांचा अनुभव सर्व लोकांनी मानवतेच्या अधिन राहून कायम राखल्याचा प्रत्यय दृष्टीपथास येतो.''[६] पण भारतात गोष्टी जास्त आणि काम कमी याचाही अनुभव प्रसाद म्हणुन सर्वांनी चाखला. भारताच्या संविधानात मानवी अधिकारांचा महत्वाचा दस्ताऐवज संविधानाच्या ३ऱ्या प्रकरणात मैलाचा दगड ठरला आहे. कारण भारतीय समाजात अनेक बाबतीत विविधता आहे. त्यातून एकता निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे. भारतीय लोकशाहीत अनेक धर्माचे, संप्रदायाचे, संस्कृतीचे, सभ्यतांचे लोक असूनही मानवाधिकाराला सार्वभौमिकता दिलेली आहे.

- अनुच्छेद १२ नुसार राज्यातंर्गत भारत सरकार आणि संसद सर्व घटकराज्य व स्थानिक स्वराज्यसंस्था नियंत्रणात काम करेल. अनुच्छेद १३ नुसार मुळ आधिकारांशी विसंगत कायद्यांचा विचार, अनुच्छेद १४ नुसार कायद्यासमोर सर्व समान, अनुच्छेद १५ नुसार धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मठिकाण या आधारावर भेदभाव केल्या जाणार नाही. अनुच्छेद १६ नुसार सर्वांना संधीची समानता, अनुच्छेद १७ नुसार अस्पृश्यतांचे उच्चाटन, अनुच्छेद १८ नुसार विशेष पदव्यांची समाप्ती, अनुच्छेद १९ नुसार विचार व अभिव्यक्तींचे स्वातंत्र्य, अनुच्छेद २० नुसार अपराध्यांना आपण गुन्हेगार की नाही हे सिद्ध करण्याचे संरक्षण, अनुचछेद ह्मघ नुसार



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

जीव किंवा शरीराचे स्वातंत्र्याचे संरक्षण, अनुच्छेद २२ नुसार कोणत्याही परिस्थीतीत कोणत्याही व्यक्तीला अटक झाली असेल तर त्याबाबत संरक्षण, अनुच्छेद २३ नुसार शोषणाविरुद्धचा अधिकार, अनुच्छेद २४ नुसार बालकांना कारखान्यात कामावर घेता येणार नाही, अनुच्छेद २५ नुसार धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान केला. अनुच्छेद २६ नुसार धार्मिक कार्याचे प्रबंधन करण्याचे स्वातंत्र्य, अनुच्छेद २७ नुसार कोणत्याही धर्माच्या अभिवृधीसाठी स्वातंत्र्य, अनुच्छेद २८ नुसार काही शिक्षण संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण वा धार्मिक उपासना करण्याचे स्वातंत्र्य पण कोणत्याही एका धर्माला शिक्षण देण्याचे स्वातंत्र्य नाही, अनुच्छेद २९ नुसार अल्पसंख्यांक वर्गाचे संरक्षण, अनुच्छेद ३० नुसार अल्पसंख्यांकांनी शिक्षण संस्था स्थापन करणे, प्रशासन करणे याबाबतचा अधिकार, अनुच्छेद ३१ नुसार संपत्तीच्या अधिकाराला ४० वे विशोधनानुसार १९७८ चे कलम ६ नुसार २०/६/१९७९ ला निशासित; अनुच्छेद ३२ नूसार घटनात्मक उपायाचा अधिकार देण्यात आला, अनुच्छेद ३३ नुसार संसदेची प्रदत्त अधिकारांची भूमिका, अनुच्छेद ३४ सैन्यांच्या प्रदत्त अधिरांवर निर्बंध, अनुच्छेद ३५ — उपबंधांना प्रभावी करण्यासाठी विधान, अनुच्छेद ३६ नुसार राज्याचे निती निर्देशक तत्वे, अनुच्छेद ३७ नुसार अन्तर्विष्ट तत्वांना लागू करणे, अनुच्छेद ३८ नुसार लोकांच्या कल्याणात अनिवृद्धीसाठी राज्य सामाजिक व्यवस्था बनवतील, अनुच्छेद ३९ नुसार समान न्याय आणि नि:शुल्क विधी मदत, अनुच्छेद ४० नुसार ग्रामपंचायतीचे संघटन, अनुच्छेद ४१ नुसार परिस्थिती नुसार काम, शिक्षण आणि लोकांचे सहाय्य प्राप्तीचा अधिकार, अनुच्छेद ४२ नुसार मानवतापूर्ण न्यायोचित कार्य व महिलांना प्रसुतीकाळात सहाय्य उपलब्ध करून देणे, अनुच्छेद ४३ नुसार कामगारांना निर्वाह निधी व्यवस्था, अनुच्छेद ४३ क नुसार उद्योगधंद्यात कामगारांना व्यवस्थापनात भाग घेण्याचा अधिकार, अनुच्छेद ४४ नुसार नागरिकांसाठी समान नागरी कायदा, अनुच्छेद



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

४५ नुसार बालकांना मोफत व अनिवार्य शिक्षण व्यवस्था, अनुच्छेद ४६ नुसार अनुसूचित जाती, जनजाती आणि अन्य मागास वर्गासाठी शिक्षण आणि आर्थिक मदतीची वाढ, अनुच्छेद ४७ नुसार पोषक आहार, जीवनस्तर उंचावणे, लोकांचे आरोग्य सुधारण्याचे राज्याचे कर्तव्य, अनुच्छेद ४८ नुसार कृषी व पशुपालनाचे संघटन, अनुच्छेद ४८ क नुसार पर्यावरण संरक्षन, सुधारणा आणि वन्यजीवांचे रक्षण करणे, अनुच्छेद ४९ नसार राष्ट्रीय स्मारक, स्थळ आणि वस्तूंचे संरक्षण, अनुच्छेद ५० नुसार कार्यपालिकेपासून न्यायपालिकेचे अलगीकरण, अनुच्छेद ५१ अंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेत वाढ करणे.''[७]

**मानवाधिकार व भारतीय संविधानातील साम्यता:**

भारतीय संविधान कलम १४ अन्वये ''राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या परिक्षेत्रात कायद्यापुढे समानता किंवा कायद्यांच्या समान संरक्षणापासून वंचित ठेवणार नाही किंवा समानता नाकारणार नाही तर कायद्यापुढे सर्व समान असतील.'' याचा मानवी आयोगाच्या जाहिरनाम्यातील तरतुद ७ नुसार ''कायद्यासमोर सर्व समान असून जागतिक स्तरावर सर्वांना कुठल्याही भेदभावाविना कायद्याचे समान संरक्षण प्रदान करण्यात येईल, या तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध किंवा अशा प्रकारच्या भेदभावाविरुद्ध समान संरक्षणाचा अधिकार सर्वांना प्राप्त होईल.'' अर्थात जागतिक स्तरावरील मानवतावादाचा समानतेचा अधिकार व्यापक करण्याचे काम भारतीय संविधान कलम १५(१) मध्ये केले ते म्हणजे ''राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही आधारावर भेदभाव निर्माण होईल अशा प्रकारचे वर्तन किंवा व्यवस्था निर्माण करणार नाही.'' भारतीय संविधान कलम १६(१) नुसार '' भारतातील सेवेमध्ये (नोकरीमध्ये) नियुक्ती करीत असतांना सर्व नागरिकांना समान संधी दिली जाईल.'' अशाच आशयाची तरतुद मानवी हक्क आयोगाच्या कलम २१(१) मध्ये नमूद आहे.



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

त्यानुसार "प्रत्येकाला आपल्या देशातील शासकीय सेवेत प्रवेश घेण्यास समान अधिकार राहील."

मानवी हक्कांच्या समर्थनार्थ अभिव्यक्ती स्वातंत्र्याला महत्व विधान कलम १९८१(अ) मधील सर्व नागरिकांना भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देण्यात आली तर मानवी हक्क जाहिरनाम्यातील कलम १९ मध्ये प्रत्येक व्यक्तीला आपले मत आणि त्यांच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असल्याचे म्हटले आहे. संविधान कलम १९(१ब), १९(क), १९(१ड) मध्ये सर्व नागरिकांना शांततामय मार्गाने, विनाशस्त्र सभा भरविण्याचे स्वातंत्र्य, संघ किंवा संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, तसेच भारतील प्रत्येक नागरीकास भारतभर मुक्तपणे संचार करण्याचा अधिकार देवून त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी दारे उघडी केली. तर मानवी हक्क आयोग कलम २०(१), २३(४), व १३(१) मधील सार सुद्धा भारतीय संविधानातील उपरोक्त तरतुदींशी मेळ घालतांना दिसतो. त्यात म्हटले की, प्रत्येकाला शांतीपूर्ण सभा आणि बैठका घेण्याचा अधिकार राहील. व्यावसायिक संघटना निर्माण करणे व त्यात सदस्य म्हणून सहभाग घेणे व व्यक्तीला प्रत्येक देशाच्या सीमांतर्गत स्वयंपूर्णतेने येण्याजाण्याचा, स्थायिक होण्याचा अधिकार राहील. पुढे भारतीय संविधान कलम १९ व त्यातील उपकलमे यावर काही प्रमाणात जी निर्बंध लावलीत ती भारताचे प्रादेशिक ऐक्य व अखंडता, सामाजिक सुव्यवस्था परकीय राष्ट्राबरोबर मैत्रीचे संबंध आदिंना कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनातून तडा जावू नये या उदात्त हेतुने ते निबंध भारतीय संविधानात घालण्यात आलेली असल्याचे नमुद केलेले आहे.

मानवी हक्क आयोग कलम २०(१), २३(४) व १३(१) मधील सार भारतीय संविधानातील तरतुदींशी मेळ घालताना दिसतो. कलम २०(१) मधील निरपराधी माणसापासून तर अपराधी माणसापर्यंत न्याय मिळावा आणि न्यायाचे राज्य निर्माण करीत



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

असतांना माणसासाठी न्याय ही संकल्पना रुजावी या हेतुने तरतूद आहे. हे कलम असे सांगते की, ''अस्तित्वात असलेल्या कायद्याचा भंग केल्याचे सिद्ध झालेल्या व्यकिलाच दोषी ठरविता येईल आणि त्या अपराधाबद्दल कायद्यात असलेल्या शिक्षेशिवाय अधिक शिक्षा त्या व्याकीला देता येणार नाही.'' याच आशयाची तरतूद मानवी हक्काच्या जाहीरनाम्यान कलम ११(२) मध्ये आहे. भारतीय संविधान कलम २१ नुसार ''कोणत्याही व्यक्तीचे जीवीत किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य हिरावण्याचा अधिकार नसेल, तसे करीत असतांना प्रस्थापित कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करावी लागेल.'' हाच आशय मानवी हक्काच्या जाहीरनाम्यात कलम ९ मध्ये असून त्यानुसार कुणालाही जबरदस्तीने कैद, स्थानबद्ध किंवा हद्दपार केले जाऊ शकणार नाही.

भारतीय समाजात वेठबिगारी, गुलामगिरी, दास्यता नष्ट भरू माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्रदान करणारी तरतूद कूलय २३ मध्ये आहे. हेच मानवी हक्काच्या जाहिरनाम्यात कलम ४ मध्ये निहित आहे. प्रत्येकाचे संविधान कलम २५(१) अन्वये श्रद्धा आणि उपासना याबाबतचे स्वातंत्र्य अबाधित रहावे. यास्तव धर्मस्वातंत्र्याची, धर्मनिरपेक्षतेची तरतूद केली आहे. यामुळे प्रत्येकाची सद्सदविवेकबुद्धीच्या स्वातंत्र्यानुसार आपल्या धर्माचा प्रसार करण्याची मुभा दिली ती सनदेमधील १८ मध्ये. प्रत्येक व्यक्तीला विचार, बुध्दी आणि धार्मिक स्वातंत्र्य प्रदान केले आहे. संविधान कलम २९(१) नुसार ''भारतात राहणाऱ्या कोणत्याही नागरिकाला आपली स्वतःची भिन्न भाषा, लिपी, संस्कृती जतन करण्याचा अधिकार प्रदान केलेला आहे. हयाचप्रमाणे मानवी हक्काच्या सनदेत कलम २२ नुसार जागतिक स्तरावर समाजाच्या प्रत्येक सदस्याला सामाजिक सुरक्षिततेचा अधिकार दिला सोबतच प्रत्येकाला राष्ट्रीय प्रयत्न आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य तसेच राज्यांतील अनुकूल साधने, आत्मप्रतिष्ठा व आपल्या व्यक्तित्वाचा स्वतंत्र विकास यासाठी



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

अनिवार्य असलेले आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भान निर्माण करणारे अधिकार प्रदान केले. संविधान कलम ३०(१) नुसार सर्व समाजांना आपल्या पसंतीच्या शैक्षणीक संस्था स्थापून प्रशासन करण्याचा अधिकार दिलेला आहे. अशीच तरतूद मानवी हक्क सनद कलम २६(३) ने प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार व मोफत प्राथमिक शिक्षण, योग्यतेच्या आधारावर उच्च शिक्षणाची समान संधीची हमी दिलेली आहे.

प्रत्येकाच्या सर्वांगीण विकासासाठी संविधान कालमा ३२ मध्ये तरतूद आहे की, ''मुलभूत अधिकारांची अंमलबजावणी करणे शासनास बंधनकारक असेल आणि असे न झाल्यास प्रत्येक व्यक्तीला न्याय संस्थेकडे शासनाविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार 'प्रदान केलेला आहे अशाच प्रकारचा अधिकार मानवी हक्काच्या जाहीरनाम्यातील कलम ८ मध्ये आहे. त्यानुसार ''कायद्याने किंवा संविधानानुसार प्राप्त करून देण्यात आलेले मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्यास प्रत्येकाला न्याय संस्थेकडून त्याबाबत योग्य ती नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार'' प्रदान करण्यात आलेला आहे.

मानवाधिकाराला भारतीय संविधानात सभ्यतेनुसार व संस्कृतीनुसार सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापना करण्यासाठी राज्याची निति निदेशक तत्वे कलम ३६ ते ५१ मध्ये अन्यूस्थून आहेत. त्यात आर्थिक न्याय व समता, सामाजिक न्याय व समता, शेती, पर्यावरण व राष्ट्रीय महत्वाच्या गोष्टीचे संरक्षण व संवर्धन, लोकशाही विकेंद्रीकरण व आंतरराष्ट्रीय शांतता, आर्थिक सुधारणा व मार्गदर्शक तत्वे यांचा प्रामुख्याने भारतीय संविधानान अंतर्भाव आहे.

१९४८ साली संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी अधिकारांची घोषणा केली आणि त्याच्या पाठोपाठ भारताने आपल्या संविधानात २६ जानेवारी १९५० ला मूलभूत अधिकारांच्या स्वतंत्र प्रकरणातून भारतातील लोकांना मानवी हक्क प्रदान करण्याचा प्रयत्न केला.



Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

सोबतच न्यायालयाचे संरक्षणही दिले आहे. तरीपण भारताच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या आगमणापर्यंत देशातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विषमता पूर्णपणे नष्ट होऊ शकली नाही. आणि माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी वातावरण निर्मीतीपण झालेली नाही. ही वास्तविकता नाकारता येत नाही.

भारतीय संविधानातील कलमांची योग्य रितीने व काळजीपूर्वक अंमलबजावणी झाली असती तर भारत जगातील मानवी प्रतिष्ठा बहाल करण्यास समर्थ राष्ट्र म्हणून गौरवास पात्र ठरले असते. डॉ. राजेंद्र प्रसादांनी संविधानिक रचनेऐवजी नागरिक सजगतेला उत्तरदायी बनविले आहे. स्वतंत्र भारताची वाटचाल करताना आता नशिब, देवदुत, चमत्कार गृहीत धरता येणार नव्हते तर जनतेची मनोव्यवस्था याला जबाबदेही असेल, असेच रचनाकारांना वाटत होते आणि ही बाब नैसर्गिकही होती. परंतु संदेहाची बाब अशी की, येथील समाजरचनेत अस्तित्वात असलेल्या विभिन्न स्तरातील समुहांनी व्यवस्थेचा वाटा स्वविकास येथपर्यंतच मर्यादीत ठेवल्याने प्रतिष्ठा निर्मीतीचे प्रयत्न पुरेशा प्रमाणात आकार घेऊ शकलेली नाही. नागरिकांनी सजग भावनेने आपले कर्तव्य पार पाडले तर त्या दृष्टीने पुरेसे व पुरक प्रयत्न करणे हेच येथील परिप्रेक्ष्यात मानवी हक्कांच्या व भारतीय संविधानाच्या संरक्षिताचा कल्याणाचा उत्तम भाग ठरू शकतो.

**संदर्भ सूची :**

१. संदीप तुंडुरवार : भारतीय परिप्रेक्ष्यात मानवी हक्क, प्रकाशक, सर साहित्य केंद्र,
गणराज अपार्टमेंट, राजापेठ बस स्टॉप, हुडकेश्वर रोड, नागपूर—३४ पृ क्र. १२२.

२. डॉ. शरद सांबारे : भारतीय परिप्रेक्ष्यात मानवी हक्क, प्रकाशक, सर साहित्य केंद्र, गणराज प्रा. राहुल वावगे अपार्टमेंट, राजापेठ बस स्टॉप, हुडकेश्वर रोड, नागपूर—३४ पृ क्र. १२३.



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

३.डॉ. शरद सांबारे : भारतीय परिप्रेक्ष्यात मानवी हक्क, प्रकाशक, सर साहित्य केंद्र, गणराज प्रा. राहुल वावगे अपार्टमेंट, राजापेठ बस स्टॉप, हुडकेश्वर रोड, नागपूर–३४ पृ क्र. १२३–१२५

४.प्राचार्य सुभाष गवई : भारतीय संविधानात्मक तरतुदी आणि वास्तव श्री.साईनाथ प्रकाशन१, भगवाघर कॉम्लेक्स, धरमपेठ, नागपूर – १० पृ.क्र. ३८

५.प्राचार्य सुभाष गवई : भारतीय संविधानात्मक तरतुदी आणि वास्तव श्री.साईनाथ प्रकाशन१, भगवाघर कॉम्लेक्स, धरमपेठ, नागपूर – १० पृ.क्र. ३९

६.दामोधर मिश्रा व : मानवाधिकार दशा और दिशा, प्रकाशक श्रीमती शशी जैन, पोइन्टर डॉ. अखिल मिश्रा पब्लिशर्स, व्यास बिल्डिंग जयपुर, प्रथम संस्करण २००६,पृ.क्र. ७ व ८

७.दामोधर मिश्रा व : मानवाधिकार दशा और दिशा, प्रकाशक श्रीमती शशी जैन, पोइन्टर डॉ. अखिल मिश्रा पब्लिशर्स, व्यास बिल्डिंग जयपुर, प्रथम संस्करण २००६,पृ.क्र. ८–२५

८.वि.स.वाळिंबे : वुई दि पीपल, नानी ह. पालखीवाला

९.डॉ.मनोज कुमार सिन्हा: मूलभूत मानवाधिकारांची अंमलबजावणी, अनुवादक डॉ. बी.एम. पेशवे प्रा. सौ. मंदाकिनी पेशवे मानक पाब्लीकेशन्स प्रा. लि.

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli




## डॉ. रिता एम. धांडेकर

एम. ए., बी. एड., सेट, नेट, पीएच. डी. (राज्यशास्त्र)

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर.


- पदवी स्तरावर - १८ वर्षे अध्यापन कार्याचा अनुभव.
- पदव्युत्तर स्तरावर - २ वर्षे अध्यापन कार्याचा अनुभव.
- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये एकूण ४० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित.
- राष्ट्रीय, राज्यस्तरीय चर्चासत्रे, परिषदांमध्ये ५० पेक्षा जास्त शोधनिबंधाचे सादरीकरण.
- अनेक ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्रे, परिषदांमध्ये सहभाग.
- संघटन सचिव - विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा पुरस्कृत मानवी हक्क व मूल्यशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम.
- संघटन सचिव - विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा पुरस्कृत सात दिवसीय मानवी हक्क जागरुकता कार्यशाळा.
- संयोजक - विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा पुरस्कृत तीन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन तारुण्यभान जीवन शिक्षण कार्यशाळा.
- 'भाषा व सामाजिक शास्त्राचे महत्त्व' आणि 'लिंगभाव समानता' या विषयावरील राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन.
- महिला हक्क, लिंगभाव समानता तथा अन्य सामाजिक व राजकीय विषयावर व्याख्याने सादर.
- सहसचिव - राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद,नागपूर (विदर्भ प्रांत) २०१७ ते २०२२.
- कार्यकारिणी सदस्य - महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद (२०१९ ते २०२२).
  आजीव सदस्य - महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद.
- कार्यकारिणी सदस्य - इंडियन रिसर्च ॲंड एज्युकेशनल फाऊंडेशन, वर्धा.


**Aadhar Publications**

New Hanuman Nagar, Infront of Pathyapustak Mandal, VMV Road, Amravati - 444604.

Email - aadharpublication@gmail.com. M.: 9595560278

ISBN:978-93-91305-56-7



Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL

Adarsh Arts & Commerce College,

Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli